पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि सोलापूर विद्यापीठ या विद्यापीठांतील न्यायाधिकरणाचे पिठासन अधिकाऱ्याचा अतिरिक्त कार्यभार मुंबई विद्यापीठाच्या पिठासन अधिकाऱ्याकडे सोपविण्याबाबत

महाराष्ट्र शासन,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक युएसजी २०११/( ५२२/११)/विशि १,
मंत्रालय, मुंबई : ४०० ३२.
दिनांक : २५ नोव्हेंबर, २०११.

**वाचा :** १)शासन निर्णय क्र. युएसजी १३९१/२०८९/विशि ४, दिनांक १९ ऑगस्ट १०९९५
२)शासन निर्णय क्र. युएसजी २०११/(१४६/११)/विशि १ दिनांक ८ एप्रिल, २०११

**प्रस्तावना** : महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे अधिनियम, १९९४ (१९९४ चा कायदा क्रमांक ३५) च्या कलम ५८ अन्वये शासनास प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन विद्यापीठाकरिता विद्यापीठ व महाविद्यालयीन न्यायाधिकरण स्थापन करण्याबाबतचे आदेश संदर्भाधीन दिनांक १९ ऑगस्ट १९९५ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार संदर्भाधीन दिनांक ८ एप्रिल २०११ च्या शासन निर्णयान्वये मा. न्यायमूर्ती श्री. एन. डी.देशपांडे यांची मुंबई विद्यापीठ, मुंबई या विद्यापीठाच्या विद्यापीठ व महाविद्यालयीन न्यायाधिकरणाच्या पिठासन अधिकारी पदावर नियुक्ती करण्यात आलेली आहे.

२. पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि सोलापूर विद्यापीठ या विद्यापीठांच्या विद्यापीठ व महाविद्यालयीन न्यायाधिकरणाचे पिठासन अधिकाऱ्याच्या सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेल्या पदाचा अतिरिक्त कार्यभार मुंबई विद्यापीठाच्या विद्यापीठ व महाविद्यालयीन न्यायाधिकरणाच्या पिठासन अधिकाऱ्याकडे सोपविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

३. मुंबई विद्यापीठ, मुंबई या विद्यापीठाच्या विद्यापीठ व महाविद्यालयीन न्यायाधिकरणाच्या पिठासन अधिकाऱ्याकडे पुणे विद्यापीठ, पुणे /शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर /सोलापूर विद्यापीठ, सोलापूर आणि या तिन्ही विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालय /मान्यताप्राप्त परिसंस्था यांचा अतिरिक्त कार्यभार पुणे/ शिवाजी/ सोलापूर या विद्यापीठांसाठी पिठासन अधिकाऱ्याची नियमित नियुक्ती होईपर्यंत सोपविण्यात येत आहे.

D:\my documents\supriya\pithasin adhikari.doc

Solapur University, Solapur
Vice - Chancellor Office
Inward No. 863
Date 14 DEC 2011
Section Low Officer

८

४. कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे /शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर /सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांना सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी न्यायमूती श्री. एन. डी. देशपांडे, पिठासन अधिकारी, मुंबई विद्यापीठ व महाविद्यालयीन न्यायाधिकरण, मुंबई यांना आवश्यक त्या सेवा सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(विकास तु. कदम)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा. कुलपतींचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. कुलगुरु, सर्व अकृषि विद्यापीठे
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा)महाराष्ट्र १, मुंबई
कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे,
सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण,
मा. मंत्री, (उवतंशि) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री, (उवतंशि) यांचे खाजगी सचिव
प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचे स्वीय सहाय्यक
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक
मा. न्यायमूर्ती, श्री. एन.डी. देशपांडे, पिठासन अधिकारी, मुंबई विद्यापीठ व महाविद्यालयीन न्यायाधिकरण, मुंबई
निवड नस्ती (विशि १)